Rotary
रोटरी क्लब लातूर

फक्त पत्रिकाच नव्हे, तर विचारांचा एक मंच जो समाजाला बदलण्याची क्षमता ठेवतो...

RID : 3132
CLUB NO. : 15520

# चक्रधर

UNITE FOR GOOD

ऑगस्ट २०२५

## स्वातंत्र्यदिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा..!



**रो. फ्रान्सेस्को ॲरेइझ्झो**
अध्यक्ष
रोटरी आंतरराष्ट्रीय (२०२५-२६)



**रो. सुधीर लातूरे**
प्रांतपाल
प्रांत ३१३२



**रो. ज़कीखान कायमखानी**
अध्यक्ष : रोटरी क्लब लातूर (२०२५-२६)



**रो. विश्वनाथ निगुडगे**
सचिव : रोटरी क्लब लातूर (२०२५-२६)



स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाचा मान ठेवू,
रोटरी क्लब लातूर सोबत नवा मार्ग धरू,
गरिबी, अशिक्षा आणि अन्याय दूर करू,
भारताला सुवर्ण भवितव्य देऊ!

पर्यावरण रक्षणाचा ध्यास घेऊ,
रोटरी क्लब लातूर सोबत स्वच्छ भारत घडवू,
भ्रष्टाचारमुक्त समाज निर्माण करू,
विकसित भारताचे स्वप्न साकार करू!

देशभक्तीची ज्योत मनामध्ये प्रज्वलित ठेवू,
रोटरी क्लब लातूर सोबत नवे ध्येय गाठू,
एकतेने प्रगतीचा मार्ग चालू,
भारताला उज्ज्वल भविष्यात नेऊ !

– रो. ज़कीखान कायमखानी
अध्यक्ष

# सदस्यवृद्धीला प्राधान्य देऊ; फक्त ऑगस्टमध्ये नाही, तर वर्षभर!

ऑगस्ट हा सदस्यता वृद्धीचा महिना असतो, पण सदस्यवृद्धी आणि संपर्क वृद्धीचे आपले उद्दिष्ट हे फक्त एका महिन्यापुरते मर्यादित नसावे- ते वर्षभर चालले पाहिजे . जेव्हा आपण रोटरी वृद्धिंगत करण्यावर लक्ष केंद्रित करतो, तेव्हा आपली सेवा करण्याची क्षमता वाढते, नेतृत्व बळकट होते, आणि आपण दीर्घकालीन अपेक्षित बदल घडवून आणू शकतो.



**फ्रान्सेस्को अरेङ्झो**
अध्यक्ष, रोटरी इंटरनॅशनल

सदस्यवृद्धी म्हणजे केवळ संख्यात्मक वाढ नव्हे. सदस्यवृद्धी म्हणजे संधीची दारे खुली करणे. सदस्यवृद्धी म्हणजे स्वत:पेक्षा मोठ्या उद्दिष्टासाठी आपला वेळ, कौशल्य आणि सर्वस्व समर्पित करण्यास तयार आहेत, अशा अधिकाधिक लोकांना रोटरीमध्ये सामील होण्यासाठी आमंत्रित करणे !

जेव्हा आपण नवीन सदस्यांचे स्वागत करतो, तेव्हा नव्या कल्पनांचा आणि नवीन ऊर्जेचा आपल्यात प्रवेश होतो. आपला प्रभाव वाढतो, क्लब मजबूत होतो, आणि रोटरी आपल्या सभोवतालच्या जगासोबत गतिमान राहते .

आज रोटरी क्लबचे पारंपरिक स्वरूप बाजूला ठेवून नवीन क्लब मॉडेल्स तयार करण्यासाठी मोठी संधी उपलब्ध आहे . नवीन सदस्यांना जोडण्यासाठी विविध पर्याय देणाऱ्या नावीन्यपूर्ण क्लबची वाढ होताना पाहणे हे माझ्यासाठी फार प्रेरणादायी आहे.

१) कोरियामध्ये सॅटेलाईट क्लब्सच्या वाढीमुळे जवळपास १,000 नव्या सदस्यांना रोटरीमध्ये आपले स्थान सापडले आहे.

२) रोमानियामध्ये रोटरियन, रोटरॅक्टर्स आणि इंटरॅक्टर्स यांच्यातील सुसंबंध भविष्यातील नेतृत्व विकासासाठी निश्चित उपयोगी ठरेल.

३) भारतात, काही रोटरियन एका समान आवडीतून एकत्र येतात (Interest based clubs) – मग ती व्यावसायिक असो किंवा सेवाभावाची आवड – आणि या नात्यामुळे त्यांचा रोटरीमधील देखील सहभाग आणि आनंद वाढतो.

४) दक्षिण आशिया, आफ्रिका आणि युरोपसारख्या विविध भागांमध्ये विशिष्ट उद्देशाने स्थापन केलेले क्लब्स ( Cause based Clubs) यशस्वी होताना दिसत आहेत.

या यशस्वी उदाहरणांमध्ये एक गोष्ट सारखी आहे – जिथे क्लब वाढत आहेत, तिथे सदस्यवृद्धी ही एक प्राथमिकता आहे आणि नवीन गोष्टी करण्याची तयारीही आहे. रोटरी एका विशिष्ट रचनेत किंवा परंपरेत मर्यादित नाही. आपण एक जागतिक पातळीवर कृतीशील असलेल्या लोकांची संघटना आहोत . त्यामुळे अनेक प्रकारचे क्लब, अनेक सेवा पद्धती, आणि रोटरीमध्ये सामील होण्यासाठी अनेक मार्ग उपलब्ध आहेत.

हीच नाविन्याची भावना आपणास नवीन समुदायांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रेरित करत आहे. जिथे आजवर रोटरी क्लब नव्हता,किंवा कधी होता पण बंद पडला अशा ठिकाणीही रोटरियन क्लब स्थापन करून रोटरी वाढवत आहेत. ते स्थानिक गरजा ओळखतात आणि त्या गरजांनुसार क्लब ची स्थापना करतात.

प्रत्येक सदस्य या प्रवासाचा एक भाग आहे. तुम्ही तुमच्या मित्राला क्लबमध्ये आमंत्रित करत असाल, नवीन मीटिंग फॉरमॅटसाठी ( In-person meeting/ online meeting/ Hybrid meeting) पाठिंबा देत असाल, माजी सदस्यांशी पुन्हा संपर्क करत असाल, किंवा तुमची रोटरी अनुभव शेअर करत असाल,तर तुम्ही रोटरी अधिक मजबूत आणि वाइब्रंट बनवत आहात.

रोटरी क्लब कोणाच्याही मालकीचा नसतो. तो एक वारसा आहे, जो आपण पुढच्या पिढीकडे सुपूर्द करतो. आपण त्या वारशाचे जतन केल्यास, इतरांना त्यात सहभागी होण्यासाठी आमंत्रित केल्यास, रोटरी एक सद्भावनेची शक्ती म्हणून टिकून राहील. चला सदस्यवृद्धीला प्राधान्य देऊ – फक्त ऑगस्टमध्ये नाही, तर वर्षभर.

मैत्री, सृजनशीलता आणि सामायिक उद्दिष्ट यांच्या जोरावर आपण रोटरी वाढवू आणि सद्भावनेसाठी एकत्र येऊ.

**अनुवाद: रो.डॉ. विनोद लड्डा**
रोटरी क्लब लातूर



A little child shall lead them: In Nepal's Gandaki province, a young student takes her turn affixing a screw into one of the panels adorning the peace pole donated to the Shree Barahi Primary School by the Rotary Club of Hall, Australia. Working with the Reach for Nepal Foundation, the Hall club helped rebuild several schools in central Nepal, constructing earthquake-resistant classrooms and installing water and sanitation upgrades.

**Chris Edwards,** Rotary Club of Hall, Australia

# प्रिय रोटरी परिवार,

रोटरी क्लब ऑफ लातूर यांना त्यांच्या पहिल्या बुलेटिनच्या प्रकाशनाबद्दल मनापासून शुभेच्छा. या बुलेटीन द्वारा आपल्या कार्यांची विविधता, यशस्विता आणि रोटरीचे मूल्य समाजासमोर मांडण्याची चांगली संधी आहे.

या बुलेटिनमधील विविध गतिविधी, डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या बातम्या आणि रोटरी इंटरनॅशनलची माहिती वाचल्याने प्रत्येक रोटेरियन आणि त्यांच्या परिवारास रोटरीच्या विविध पैलूंची अधिक चांगल्या पद्धतीने माहिती मिळेल.



सुधीर आणि संगीता लातूरे,
प्रांतपाल, RID 3132

हे केवळ माहितीपुरतेच नाही, तर प्रत्येक वाचकाला अधिक जाणकार आणि प्रेरित रोटेरियन बनवते. हे बुलेटीन जास्तीत जास्त मित्र, परिवार आणि समाजामध्ये शेअर करावे.

जेव्हा लोकांना रोटरीने समाजासाठी केलेल्या कामाची माहिती वाचायला मिळेल. तेव्हा रोटरीची प्रतिमा आणि प्रतिष्ठा आणखीन वाढेल. यावर्षी रोटरी इंटरनॅशनल अध्यक्षांचा मेसेज: Unite for Good या संदेशाने आपल्याला प्रेरणा मिळते. या घोषणेप्रमाणे, आपण सर्व जण एकत्र येऊन, सीमा ओलांडून, विभागांमध्ये आणि समाजांमध्ये सहकार्याने स्थायी आणि सकारात्मक बदल घडवूया. रोटरीचे सामूहिक सामर्थ्य आणि एकता आपल्याला जगात सकारात्मक बदल घडवण्याची ताकद देते.

रोटरी इंटरनॅशनलच्या प्लॅननुसार स्थानिक आणि जागतिक शांतता आणि सामंजस्य निर्माण करणे, रोटरीची क्षमता वाढविणे आणि सार्वजनिक प्रतिमा उजळवणे यासाठी प्रयत्न केला पाहिजे. आपण अधिक प्रभावी, नाविन्यपूर्ण मार्ग चोखाळणे आणि सामूहिक प्रयत्न करावेत, जेणेकरून आपल्याला समाजात आणि जगात चांगले परिवर्तन घडवता येईल.

Unite for Good या घोषणेखाली एकत्र येऊन, आपण नक्कीच समाजात मोठा फरक निर्माण करू शकतो. आपल्या यशस्वी भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा..!

## मनोगत

७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या पावन पर्वानिमित्त सर्व भारतीय नागरिकांना माझ्याकडून आणि रोटरी क्लब लातूरच्यावतीने मन:पूर्वक शुभेच्छा!

आपला स्वातंत्र्य दिन म्हणजे आपल्या स्वातंत्र्य सैनिकांचे, महापुरूषांचे, संविधानाचे, लोकशाही मूल्यांचे आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक. या दिवशी आपण सर्व भारतीय मिळून आपल्या देशाच्या विकासाचा संकल्प पुन्हा एकदा नव्याने करतो. सर्वांच्या सहभागातून, सर्वांच्या प्रगतीसाठी ही भावना आज अधिक महत्त्वाची वाटते.

या वर्षी मला रोटरी क्लब लातूर या गौरवशाली संस्थेचे अध्यक्षपद भूषवण्याची संधी मिळाली आहे. माझ्यासाठी ही केवळ एक जबाबदारी नाही, तर एक अद्वितीय संधी आहे. समाजासाठी अधिकाधिक चांगले काम करण्याची.



रो. जकी खान कायमखानी
अध्यक्ष, रोटरी क्लब लातूर

आपला क्लब ५५ वर्षांचा असून, अनेक पूर्व अध्यक्ष आणि वरिष्ठ सदस्यांनी अतिशय मेहनतीने आणि तळमळीने जी सेवा कार्याची परंपरा घडवली आहे, ती खरंच कौतुकास्पद व प्रेरणादायी आहे. त्यांनी आपल्याला जी रोटरी सभागृह ही भव्य, तीन मजली वास्तू दिली आहे, ती केवळ इमारत नसून एक प्रेरणेचा स्रोत आहे.

या सभागृहाचा उपयोग समाजोपयोगी उपक्रमांसाठी अधिक प्रभावीपणे व्हावा, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. याचसोबत मी सर्व सदस्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

आपले सर्व मेंबर्स हे उत्साही, सेवाभावी व ज्ञानसंपन्न आहेत. त्यांच्या सहकार्यामुळे मला विश्वास आहे की आपण या वर्षी रोटरीच्या माध्यमातून नवीन ऊर्जा, नव्या कल्पना आणि एकत्रित प्रयत्नांतून समाजात सकारात्मक बदल घडवू.

Unite for Good या संकल्पनेने प्रेरित होऊन, आपण सर्वांनी मिळून रोटरीच्या कार्याला नवीन दिशा व उंची द्यावी, हीच अपेक्षा!

## समाजसेवा हीच खरी आपली ओळख...

रोटरी क्लब लातूरचा नूतन सचिव म्हणून कार्यभार स्वीकारताना मला मनापासून सन्मान आणि अभिमान वाटतो. क्लबमधील सर्व सदस्यांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन.



रो. विश्वनाथ निगुडगे
सचिव, रोटरी क्लब लातूर

समाजसेवा हीच आपली खरी ओळख असून, त्या भावनेने प्रेरित होऊन विविध उपक्रम राबविण्यासाठी अध्यक्ष आणि क्लबला पूर्ण सहकार्य देण्याचा माझा संकल्प आहे.

माजी सचिव रो. ज़कीखान कायमखानी यांनी सुरू केलेली रेकॉर्ड कीपिंगची चांगली परंपरा मी पुढेही कायम ठेवीन. तसेच, डिस्ट्रिक्ट कार्यालयाशी आणि सर्व डिस्ट्रिक्ट डिरेक्टर्स सोबत योग्य व नियमित प्रोजेक्ट रिपोर्टिंग करण्यासाठी मी विशेष प्रयत्न करीन.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने, रोटरी क्लब लातूर नवे उपक्रम, नवे प्रकल्प आणि नवे विक्रम गाठेल, असा मला पूर्ण विश्वास आहे.

रोटरी क्लब लातूरने सदैव जनसामान्यांच्या कल्याणाचा विचार केला आहे. समाजोपयोगी उपक्रमांनी रोटरी क्लब लातूरला लोकाभिमुख करण्यासाठी अध्यक्षांसोबत मी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. आम्ही इन्स्टॉलेशन सेरेमनीपासून समाजोपयोगी कामांना सुरूवात केली आहे. सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

# रोटरी क्लब लातूर पदग्रहण समारंभ उत्साहात संपन्न

## ६ गरीब विद्यार्थ्यांना घेतले दत्तक, १० शालेय विद्यार्थ्यांना वाटप केल्या रेंजर सायकल

लातूर : रोटरी क्लब लातूरच्या वतीने इंस्टॉलेशन सेरेमनी (पदग्रहण समारंभ) चे आयोजन शनिवार, दिनांक ५ जुलै रोजी राधिका कन्व्हेन्शन हॉल येथे करण्यात आले होते. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रोटरीचे डीजी सुधीर लातुरे, मोहन कुमार के.व्ही. होते. मंचावर नुतन अध्यक्ष ज़कीखान कायमख़ानी, सचिव विश्वनाथ निगुडगे आणि माजी अध्यक्ष श्रीमंत कावळे उपस्थित होते. यावेळी रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ ॲसपायरेशन लातूरचाही पदग्रहण सोहळा पार पडला. नूतन अध्यक्षस्थानी कौशल्या जांबुवंतराव सोनकवडे, तर सचिव वनिता सुदेश लचुरिया आहेत. यावेळी सर्व रोटरियन्स व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांसह शहरातील शेकडो प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख पाहुणे सुधीर लातूरे यांनी रोटरीचा उद्देश सांगून सामाजिक कार्यात पुढाकार घेण्याचे आवाहन केले.




वृक्षांना पाणी देऊन कार्यक्रमाचे उद्घाटन करताना मान्यवर.



मोहन कुमार के.व्ही. म्हणाले, लातूर रोटरीने मोठे प्रोजेक्ट्स हाती घ्यावेत. लातूर सामाजिक कार्यात अग्रेसर राहणारे शहर आहे. येथून राज्यातील रोटरियन्सना सकारात्मक दिशा मिळेल.



रो.मोहन कुमार के.व्ही. व रो. सुधीर लातूरे यांचे स्वागत रो. जकीखान कायमखानी, रो. श्रीमंत कावळे.



रोटरीचे नूतन अध्यक्ष ज़कीखान कायमखानी म्हणाले, रोटरी फोर वे टेस्टवर चालते. ती गाईडलाईन जर पाळली तर उद्देश सफल होतो. आपले विचार, शब्द आणि कार्य हे सत्य आहेत का? हे पारदर्शक आहेत का? त्यामुळे सुसंबंध व मित्रत्व प्रस्थापित होईल का?, ते सर्व समाजाला फायदेशीर ठरतील का? हे चारसुत्र दिशादर्शक आहेत. सर्व रोटरीयन्सना आवाहन आहे की त्यांनी वरील सुत्र आपल्या डोळ्यासमोर ठेवून कार्य करावे. हे सुत्र आपल्या दैनंदिन जीवनात ही वापरावेत. यावेळी त्यांनी वर्षभर केल्या जाणाऱ्या कामांची माहिती दिली.



रोटरी क्लब लातूरचे पूर्व अध्यक्ष श्रीमंत कावळे यांनी गतकाऱ्याचा आढावा सादर केला. तसेच त्यांनी नूतन अध्यक्षांचा सत्कार करून कार्यभार सोपविला.

**सायकल बँक उपक्रम...**

लातूर शहरातील गरीब आणि शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सायकल बँक उपक्रम राबविण्याचे ठरविले. त्याअंतर्गत आयटीआय महाविद्यालयास १० सायकल्स देण्यात आल्या.

**सहा विद्यार्थ्यांना दत्तक घेण्यात आले**

रोटरी क्लबच्या वतीने अनाथ आणि अत्यंत गरजू कुटुंबातील ६ विद्यार्थ्यांना दत्तक घेण्यात आले. त्यांच्या राहण्या-खाण्याचा तसेच शैक्षणिक खर्चाचा संपूर्ण भार रोटरी क्लब उचलणार आहे.

कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन डॉ. गोपाल बाहेती यांनी केले. यावेळी विनोद लड्डा, मोहन परदेशी, रामप्रसाद राठी, प्रवीण होळीकर, हर्षद राजूरकर आदींसह लातूरचे सर्व रोटरीयन्स उपस्थित होते. आभार विश्वनाथ निगुडगे यांनी मानले.

# सायकल बँक अंतर्गत रोटरीने होतकरू विद्यार्थ्यांना केले सायकलींचे वाटप

**लातूर :** रोटरी क्लब लातूरच्या वतीने औद्योगिक प्रशिक्षण संस्था लातूर येथे होतकरू विद्यार्थ्यांसाठी सायकल बँक स्थापन करण्यात आली. याचे उद्घाटन रोटरी चे माजी प्रांतपाल डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे, रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष जकीखान कायमखानी, सचिव विश्वनाथ निगुडगे याच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील गरजू, होतकरू मुलींना या सायकलींचे वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे म्हणाले, विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवावे, त्यासाठी वेळेचे नियोजन करावे. जुन्या काळामध्ये शिक्षण घेण्यासाठी भरपूर कसरत करावी लागायची. शाळा, महाविद्यालयाचे दूर असायची. आजसारखी प्रवास व्यवस्था नसायची. चालत जावे लागायचे. आज आपल्याला रोटरी सारख्या संस्था मदत करण्यात पुढे आहेत. याचा आपल्या भविष्य बनविण्यासाठी उपयोग करून एक यशस्वी व्यक्ती व्हावे, असे आवाहन डॉ. मोतीपवळे यांनी केले. यावेळी रोटरी चे प्रोजेक्ट चेअरमन अनिरुद्ध मुचलंबकर, मोहन परदेशीं, सुनील कोचेटा, हरिप्रसाद सोमाणी, सॅटेलाईट क्लबच्या अध्यक्षा कौशल्या सोनकवडे, वनिता लाचुरिया सह सर्व रोटरियन तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थी, प्राध्यापकांची उपस्थिती होती.

**सायकल बँक उद्घाटन समारंभा प्रसंगीचे छायाचित्र...**












**सायकल बँक संकल्पना...**

रोटरी क्लब लातूरच्या वतीने पहिल्यांदाच सायकल बँकेची संकल्पना अमलात आणली आहे. ज्या संस्थेत गरीब, होतकरू विद्यार्थी लांबून प्रवास करतात. त्या महाविद्यालयांना नवीन सायकली घेऊन द्यायच्या. विद्यार्थ्यांनी जोपर्यंत आपला कोर्स सुरू आहे तो पर्यंत त्या वापरायच्या व नंतर त्या महाविद्यालयात जमा करायच्या. महाविद्यालयाने त्याची दुरुस्ती करून पुढे येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्या वापरता येतील, याची सुविधा करायची. जेणेकरून त्या सायकलींचा पुरेपूर विद्यार्थ्यांना उपयोग करता येईल, असे रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष जकीखान कायमखानी म्हणाले.

**सकारात्मक दृष्टिकोण महत्त्वाचा**

रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष ज़कीखान कायमखानी म्हणाले, जीवनात सकारात्मक दृष्टिकोण हा खूप महत्वाचा आहे. आपल्या जीवनात ध्येय निश्चिती फार महत्वाची आहे. विद्यार्थ्यांनो तुम्ही जीवनात यशस्वी व्हाल यात शंका नाही. आपल्या गुरुजनांचा, आई–वडिलांचा नेहमी सन्मान करावा, असेही ते म्हणाले.


लोकमत
रोटरी क्लबकडून मुलींना सायकलींचे वाटप


दिव्य मराठी विशेष
लातूर येथील रोटरी क्लबचा सायकल बँक उपक्रमाचा उद्घाटन सोहळा
गरजू विद्यार्थ्यांना घरापासून शाळा होणार जवळ


पुरोगामी विचाराचे
एकमत
होतकरू विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप । विद्यार्थ्यांच्या वेळेचा अपव्यय टळणार
रोटरी क्लबचा सायकल बँकेचा उद्

# रोटरी क्लब लातूरच्या लोकोपयोगी उपक्रमांना शहरातील लोकप्रिय वर्तमानपत्रांनी प्रसिद्धी देऊन जनसामान्यापर्यंत पोहोचविले

**लोकमत, लोकमत समाचार, दिव्य मराठी, एकमत, पुण्यनगरी, सकाळ, हिन्दनामासह अन्य वर्तमानपत्रांनी प्रसिद्धी दिली; सर्वांचे आभार**

लोकमत

## रोटरी क्लब लातूरच्या अध्यक्षपदी जकीखान कायमखानी यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क



जकीखान कायमखानी



विश्वनाथ निगुडगे

**लातूर :** रोटरी क्लब लातूरच्या २०२५-२६ या वर्षासाठी नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. यात रो. जकीखान कायमखानी यांची अध्यक्षपदी, तर रो. विश्वनाथ निगुडगे यांची सचिवपदी सर्वानुमते निवड झाली आहे.

कार्यकारिणीत क्लब लर्निंग फॅसिलिटेटर म्हणून रो. डॉ. विनोद लड्डा आणि कोषाध्यक्ष म्हणून रो. सुधाकर कोटगिरे यांची निवड झाली आहे. यासोबतच टीआरएफ चेअर आणि पोलिओ प्लस समितीपदी रो. संजय निलेगावकर, सदस्य नोंदणीसाठी रो. मोहन परदेशी, जनसंपर्क आणि आयटी चेअर म्हणून रो. बाबुराव सोमवंशी, क्लब प्रशासन आणि फेलोशिप चेअरसाठी रो. रामप्रसाद राठी यांची निवड करण्यात आली आहे.

माजी अध्यक्ष रो. श्रीमंत कावळे यांच्यासह इतरही अनेक सदस्यांनी विविध पदांची जबाबदारी स्वीकारली आहे. नूतन पदाधिकाऱ्यांचे यावेळी स्वागत करण्यात आले.

Hello Latur
Page No. 2 Jun 23, 2025
Powered by: erelego.com

शिबिर यशस्वितेसाठी अथक परिश्रम घेतले.

## रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी कायमखानी यांची निवड

लातूर । रोटरी क्लब लातूरच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध



उद्योजक जकीखान कायमखानी व सचिवपदी विश्वनाथ निगुडगे यांची सन २०२५-२६ या नवीन वर्षासाठी निवड सर्वानुमते करण्यात आली. नवीन वर्षात शैक्षणिक, सामाजिक उपक्रमांसह दिव्यांग, वंचित, महिला सबलीकरण व युवकांसाठी विविध उपक्रम राबवण्याचा संकल्प केला आहे. क्लबच्या कार्यकारिणीत क्लब लर्निंग फॅसिलीटेटर पदी डॉ. विनोद लड्डा, कोषाध्यक्ष सुधाकर कोटगिरे यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी विविध पदांसाठी संचालकांची निवडही जाहीर करण्यात आली. यामध्ये टीआरएफ चेअर आणि पोलिओ प्लस समिती, सदनोंदणी, जनसंपर्क, चेअर आयटी, क्लब प्रशासन आणि फेलोशिप चेअर, सेवा प्रकल्प आणि बुलेटिन संपादक, सीएसआर आदी

लोकमत समाचार

## रोटरी क्लब की नई कार्यकारिणी घोषित



जकी खान



विश्वनाथ निगुड़गे

**लातूर :** रोटरी क्लब ऑफ लातूर की नई कार्यकारिणी घोषित की गई. 2025-26 के लिए अध्यक्ष जकी खान कायमखानी और सचिव विश्वनाथ निगुड़गे चुने गए. क्लब लर्निंग फैसिलिटेटर डॉ विनोद लड्डा, कोषाध्यक्ष सुधाकर कोटगीरे, टीआरएफ चेयर व पोलियो प्लस समिति संचालक संजय निलेगावकर, सदस्यता पंजीयन मोहन परदेशी, जनसंपर्क, चेयर आईटी बाबुराव सोमवंशी, क्लब प्रशासन व फेलोशिप चेयर रामप्रसाद राठी, सेवा प्रकल्प व बुलेटिन संपादक नागनाथ कलवले, समाज सेवा व स्वास्थ्य सुविधा डॉ [illegible], समाज सेवा [illegible], समाज सेवा [illegible], सीएसआर संचालक सुनील कोचेटा, अंतर्राष्ट्रीय सेवा [illegible], युवा सेवा प्रवीण होलीकर, व्यावसायिक सेवा संजय [illegible], साक्षरता व शिक्षा [illegible], पर्यावरण संरक्षण सतीश दिवाण, जिला आपदा प्रबंधन [illegible], जल एवं स्वच्छता महेंद्र जोशी, [illegible] का चयन होने की जानकारी रोटरी के संचालक रामप्रसाद राठी ने दी. शिक्षा, सामाजिक, दिव्यांग, वंचित, महिलाओं-युवाओं के कार्यक्रम करने का संकल्प लिया गया.

Apna Samachar
Page No. 3 Jun 22, 2025
Powered by: erelego.com

लोकमत समाचार

## सामाजिक कार्यों में आगे आने पर जोर दिया

**लातूर :** रोटरी क्लब लातूर का पदग्रहण समारोह शनिवार को राधिका कन्वेंशन हॉल में उत्साहपूर्ण वातावरण में आयोजित किया गया. इसमें सुधीर लातुरे ने रोटरी क्लब के उद्देश्य बताते हुए सामाजिक कार्यों में आगे आने की अपील की.

मोहन कुमार ने कहा कि लातूर रोटरी क्लब को बड़े प्रोजेक्ट्स हाथ में लेने चाहिए. लातूर सामाजिक कार्यों में अग्रणी शहर है. यहां से राज्य के रोटेरियन्स को प्रेरणा मिल सकती है. नए अध्यक्ष जकी खान कायमखानी ने कहा कि रोटरी क्लब चार सूत्रों के आधार पर कार्य करता है. इसलिए सभी रोटेरियन्स से इन चार सिद्धांतों को ध्यान में रखते हुए कार्य करने की अपील की गई है. प्रमुख अतिथि रोटरी के डीजी सुधीर लातुरे और मोहन कुमार केवी थे. मंच पर नए अध्यक्ष जकी खान, सचिव विश्वनाथ निगुड़गे, पूर्व अध्यक्ष श्रीमंत कावले आदि उपस्थित थे. इस दौरान रोटरी सैटेलाइट क्लब ऑफ एस्पिरेशन लातूर का पदग्रहण समारोह भी हुआ. इस क्लब की अध्यक्ष के रूप में कौशल्या सोनकवड़े और सचिव वनिता लचुरिया ने कार्यभार संभाला. इस अवसर पर विनोद लड्डा, मोहन परदेशी, रामप्रसाद राठी, प्रवीण होलीकर, हर्षद राजूरकर समेत रोटेरियन सदस्य, प्रतिष्ठित नागरिक उपस्थित थे. संचालन डॉ गोपाल बाहेती ने किया. आभार विश्वनाथ निगुड़गे ने माना.

**दस साइकिलें वितरित**

लातूर के गरीब व पाठशाला जाने वाले दस विद्यार्थियों को साइकिलें वितरित की गईं. रोटरी क्लब की ओर से अनाथ व जरूरतमंद परिवार के दस विद्यार्थियों को गोद लिया गया. इन विद्यार्थियों के रहने-खाने की व्यवस्था व शिक्षा का खर्च क्लब उठाएगा.





दिव्य मराठी लातूर जिल्हा 08-07-2025





## रोटरी क्लब लातूरचा पदग्रहण समारोह हर्षोल्हासात

■ ६ गरीब विद्यार्थ्यांना घेतले दत्तक ■ १० शालेय विद्यार्थ्यांना वाटप केल्या रेंजर सायकल





[illegible]

एकमत (पुरोगामी विचाराचे) page- 5 [illegible] Jul 2025

पदग्रहण समारंभ उत्साहात । १० शालेय विद्यार्थ्यांना वाटप केल्या रेंजर सायकली

## रोटरी क्लब लातूरने १० गरीब विद्यार्थ्यांना घेतले दत्तक

लातूर : प्रतिनिधी



[illegible]

लोकमत



रोटरी क्लब ऑफ लातूर आणि रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ लातूर अॅस्पिरेशनच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात झाला. यावेळी जकिखान कायमखानी, विश्वनाथ निगुडगे यांच्यासह कौशल्या सोनवणे, वनिता लचुरिया यांनी पदभार स्वीकारला.

## रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ लातूरचा पदग्रहण सोहळा

लोकमत न्यूज नेटवर्क

रोटरी क्लब : सहा विद्यार्थ्यांना दत्तक

[illegible]

लोकमत समाचार

एक नजर...

## रोटरी क्लब की ओर से पचास पौधों का रोपण



लातूर के एमआईडीसी परिसर में मंगलवार को रोटरी क्लब लातूर की ओर से पचास पौधों का रोपण किया गया.

**लातूर :** रोटरी क्लब लातूर की ओर से और ग्रीन लातूर वृक्ष टीम के सहयोग से मंगलवार को एमआईडीसी परिसर में पचास पौधों का रोपण किया गया. पौधारोपण का उद्घाटन सुधीर लातूरे के हाथों किया गया. इसके बाद सभी रोटरी सदस्यों ने पौधारोपण किया. समारोह में सुधीर लातूरे ने कहा कि मराठवाड़ा में 35 प्रतिशत पेड़ होना आवश्यक है. लेकिन 5 प्रतिशत से कम जंगल होने से बारिश की असमानता देखने को मिल रही है. इसका परिणाम सभी क्षेत्रों में दिखाई दे रहा है. इसलिए पौधारोपण समय की जरूरत है. रोटरी के अध्यक्ष जकी खान कायमखानी ने कहा कि पौधारोपण करते हुए पर्यावरण संतुलन रखना हमारा निश्चय है. ईश्वर ने मनुष्य को जीवन जीने के लिए जो प्राकृतिक संसाधन दिए हैं, उनका संवर्धन जरूरी है. इसलिए नए चुनाव के बाद हमने पौधारोपण करते हुए सामाजिक कार्य की शुरुआत की है. हम केवल पेड़ लगाने तक ही सीमित नहीं रहेंगे, बल्कि उनका संवर्धन करने का प्रयास होगा. इस अवसर पर रविशंकर हिंगणे, मोहन परदेशी, विश्वनाथ निगुड़गे, महेंद्र जोशी, बाबूराव सोमवंशी, विनोद लड्डा, नागनाथ कलवले, एड सतीश दिवाण, एड श्रीराम देशपांडे, आसिफ शेख, प्रसाद राठी, गोपाल बाहेती, सुधाकर कोटगिरे, हरिप्रसाद सोमाणी, सुनील कोचेट्टा, एड सोनकांबले, सुशांत कुलकर्णी, प्रवीण होलीकर, विश्वजीत कदम, ब्रह्मकुमार सुवर्णकार, हर्षद राजूरकर, नरेश कोरे, श्रीमंत कावले, डॉ पवन लड्डा आदि उपस्थित थे.

Apna Samachar
Page No. 3 Jul 04, 2025
Powered by: erelego.com

पुरोगामी विचाराचे एकमत page- 8 03 Jul 2025



## रोटरी क्लबतर्फे ५० वृक्षांचे रोपण

लातूर : प्रतिनिधी

रोटरी क्लब लातूरच्या वतीने एमआयडीसी परिसरात ५० वृक्षांचे रोपण ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या सहकार्याने करण्यात आले. उद्घाटन प्रमुख पाहुणे डीजी सुधीर लातुरे यांच्या हस्ते झाले. यानंतर सर्व रोटरीयन्सनी वृक्ष लागवड केली. यावेळी रविशंकर हिंगणे, मोहन परदेसी, विश्वनाथ निगुडगे, महेंद्र जोशी, बाबुराव सोमवंशी, विनोद लड्डा, नागनाथ कलवले, ॲड. सतीश दिवाण, ॲड. श्रीराम देशपांडे, आसीफ शेख, प्रसाद राठी, गोपाळ बाहेती, सुधाकर कोटगीरे, हरीप्रसाद सोमाणी, सुनिल कोचेट्टा, ॲड. सोनकांबळे, सुशांत कुलकर्णी, प्रविण होळीकर, विश्वजीत कदम, ब्रम्हकुमार सुवर्णकार, डॉ. पवन लड्डा यांची प्रमुख उपस्थिती होती.

लोकमत



## रोटरी क्लबच्या वतीने ५० रोपांची लागवड

**लातूर :** शहरातील रोटरी क्लब लातूरच्या वतीने मंगळवारी सकाळी एमआयडीसी परिसरात ५० रोपांची लागवड ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या सहकार्याने करण्यात आल[illegible] उद्घाटन डीजी सुधीर लातुरे यांच्या हस्ते झाले. यावेळी सुधीर लातुरे म्हणा[illegible] पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी वृक्षलागवड सर्वात महत्त्वाची आहे. वृक्षाची जोपास[illegible] करणे गरजेचे आहे. रोटरीचे अध्यक्ष जकीखान कायमखानी म्हणाले, नवीन रोटरीय[illegible] वर्षाची सुरूवात वृक्ष लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा निश्चय केला आहे. यावे[illegible] रविशंकर हिंगणे, मोहन परदेशी, विश्वनाथ निगुडगे, महेंद्र जोशी, बाबूराव सोमवंश[illegible] विनोद लड्डा, नागनाथ कलवले, ॲड. सतीश दिवाण, ॲड. श्रीराम देशपांडे, आसिफ शे[illegible] प्रसाद राठी, गोपाळ बाहेती, सुधाकर कोटगिरे, हरिप्रसाद सोमाणी, सुनील कोचेट्टा, ॲ[illegible] सोनकांबळे, सुशांत कुलकर्णी, प्रवीण होळीकर, विश्वजित कदम, ब्रह्मकुमार सुवर्णका[illegible] हर्षद राजूरकर, नरेश कोरे, श्रीमंत कावळे, डॉ. पवन लड्डा यांची उपस्थिती होती.

Hello Latur
Page No. 3 Jul 03, 2025
Powered by: erelego.com

हिन्दनामा

17/7/2025 लातूर - महाराष्ट्र

## होनहार विद्यार्थियों को साइकिलों का वितरण

रोटरी क्लब की साइकिल बैंक का उद्घाटन समारोह उत्साहपूर्वक संपन्न



**साइकिल बैंक की संकल्पना...**

[illegible]

# रोटरी क्लब एक कुटुंब...



टू डे आय एम व्हेरी हॅप्पी टू बी हिअर, बिकॉज रोटरी क्लब इज जस्ट लाईक फॅमिली फॉर मी., गेली अनेक वर्षांपासून क्लबशी मी असा जुडलो किंवा एकरूप झालो आहे की आपण काही वेगळे आहोत ही कल्पना सुध्दा डोक्यात येऊ शकत नाही. क्लबचे चढउतार आणि यातून साकारलेली आपली उज्वल परंपरा याचा मी साक्षीदार राहिलो आहे अर्थात हे सारे काम मी आपल्या सहकार्याने आणि आपलेपणानेच करू शकलो याची मला पुरती जाणीव आहे.

मी अध्यक्ष असताना पन्नास (५०) नवे सदस्य रोटरीशी जोडले गेले आणि यासाठी भारतीय पातळीवरची प्रथम फर्स्ट प्राईजची ट्राफी आपल्याला मिळाली. पुढे रो. सुनिल कोचेटा अध्यक्ष असताना २५ नवे सदस्य केल्याबद्दल प्रांतामध्ये द्वितीय पारितोषिक प्राप्त करण्यात आपल्याला यश मिळाले. आपण येथेच थांबलो नाही तर रो. ज़कीखान यांच्या सध्याच्या कार्यकाळात एकोणतीस (२९) नवे सदस्य झाले आणि आणखी दहा (१०) सद लवकरच क्लबशी जुडणार आहेत.

या वरून हेच सिद्ध होते की Nothing is impossibal if we try 'केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे.' म्हणून आपण परत निर्धार करून प्रथम स्थान प्राप्तीसाठी पुढे झेप घेऊया आणि यासाठी 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ', हा मंत्र जपूया. विशेषतः नव्या पिढीच्या युवकांना रोटरी क्लबशी जोडण्याचा प्रयत्न झाला पाहिजे असे मला वाटते. हे कार्य करण्यासाठी आज आपल्याकडे अनुभव, ज्ञान, इच्छाशक्ती आणि मोबाईल सारखे नवे तंत्रज्ञान सारे काही उपलब्ध आहे. म्हणून आज हा निर्धार करू की, 'हम होंगे कामयाब हम होंगे कामयाब एक दिन'

Be active and glad Be happy and glad. Thank you and best of luck

आपला
**रो. मोहन परदेसी**
मेम्बरशिप डेव्हलपमेन्ट डायरेक्टर
रोटरी क्लब लातूर

# रोटरीचा इतिहास रचणारे अलौकिक चार यार !!

## मिल बैठे चार यार, रच दिया इतिहास

व्यवसायाला प्रतिष्ठा आणा, रोटेरियन व्हा. रोटरी चे संस्थापक श्री पॉल हॅरीस हे एक निष्णात वकील होते, शिकागो मध्ये ते वकिली व्यवसाय करत. अशील- तारीख-क्रॉस-प्लीड यात ते पारंगत होतेच, परंतु वकिली व्यवसायाशी निगडित सर्व संस्थांशी (म्हणजे स्थानिक, राज्यस्तरीय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील) ते निगडितच नव्हते तर, अगदी क्रियाशील सदस्य, नेते कार्यकर्ते होते. तरीही पॉल हॅरीसना वाटे काहीतरी चुकतय, कमी पडतय. त्यांना जाणवत होतं की विसाव्या शतकाच्या सुरुवातीला त्या काळात विविध व्यावसायिक व व्यापारी यांचा एकमेकात संबंध व ताळमेळ खूप कमी होता. त्यांच्या राहणीमान विचारसरणीत फार फरक नसेलही, परंतु त्यांचा एकमेकांचा संवाद किंबहुना सुसंवाद कमी होता. एक विसंवादाची दरी होती ही दरी भरून काढण्याचे पॉल हॅरिसने ठरविले, प्रत्येक व्यावसायीक कामाने, पैशाने, मोठा असला तरी इतर क्षेत्रातील मित्र नसल्याने थोडा एकटा, एकलकोंडा, चिडचिडा, सुखी असूनही त्रस्त आहे, असे त्यांनी पाहिले.ही स्थिती बदलण्याचे त्यांनी ठरविले. त्याचबरोबर प्रत्येक व्यवसायाला सचोटी मिळवून देण्यासाठी, सन्मान देण्यासाठी, काहीतरी करायचे त्यांनी ठरविले आणि रोटरी चा जन्म झाला.



शिकागो येथे १९०५ मध्ये २३ फेब्रुवारीला झालेल्या, त्या पहिल्या रोटरी मिटिंगला वकील साहेब पॉल हॅरीस यांनी निमंत्रित केले होते, एका कोळसा व्यवसायिकाला, एका शिंप्याला आणि खाण अभियंता, गुस्तावस लोहर, सिल्वेस्टर शील, हिराम शोरी आणि दस्तुरखुद्द पॉल हॅरीस! हे सर्व शिकागोमधील लोहर च्या कार्यालयात एकत्र भेटले आणि ही जगातील पहिली रोटरी मिटिंग ठरली. या चौघांतले पॉल हॅरीस, हे अमेरिकेत विंसोफ्ट विस्कॉन्जिनमधल्या रेसिन येथील. त्यांचे शिक्षण वरमाऊंट प्रिन्स्टन आणि आयोवा विद्यापीठात झाले ते वकील होते आणि १९१० ते १९१२ या काळात रोटरी अध्यक्ष होते. रोटरी क्लब ऑफ शिकागोचे ते त्यांच्या मृत्यूपर्यंत २७ जानेवारी १९४७ पर्यंत तहहयात सदस्य होते. गुस्तावस लोहर, हे खाण इंजिनियर होते. १८ ऑक्टोबर १८६४ ला इंलियइस राज्यातील कारलीन व्हीले (अमेरिका) येथे त्यांचा जन्म झाला. ते काही वर्षाकरिताच रोटेरियन होते.. क्लब व आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांनी कधीही पद सांभाळले नाही. रोटरीची पहिली मीटिंग त्यांच्या कार्यालयात पार पडली, खोली क्र. - ७११, युनिटी बिल्डिंग, डाऊन टाऊन शिकागो- हा तो ऐतिहासिक पत्ता. लोहर यांचे निधन शिकागोमध्ये २३ मे १९१८ ला झाले. हीराम शोरी, हे व्यवसायाने मर्चंट टेलर (कापड शिवणारे व्यावसायिक) होते. त्यांनी सचिव म्हणून पहिल्या वर्षी रोटरी क्लब शिकागोचे काम पाहिले. तेही काही वर्षेच रोटरीयन होते. त्यांचा जन्म अमेरिकेत मेन येथे, ऑगस्ट १८६२ मध्ये आणि निधन मार्च १९४४ मध्ये झाले. सिल्वेस्टर शीले हे कोळसा व्यापारी होते. रोटरी क्लब शिकागोचे ते पहिले अध्यक्ष, वर्ष १९०५, रोटरी इंटरनॅशनलचे जुलै ते डिसेंबर १९४५ या काळात कोषाध्यक्ष होते. अमेरिकेतील इंडियाना राज्यातील टेरे हॉटे येथे जून १८७० मध्ये शीले यांचा जन्म झाला. टेरे हॉटे बिझनेस कॉलेजमध्ये ते शिकले आणि अमेरिकन सैन्यात, स्पेन-अमेरिका युद्धात त्यांनी सेवा बजावली. शील कोल कंपनी या त्यांच्या कंपनीचे ते १९०२ ते १९३९ या काळात अध्यक्ष होते. सिल्वेस्टर शीले व पॉल हॅरीस हे आयुष्यभर जिवाभावाचे मित्र म्हणून कायम राहिले, ते राहायलाही ही शिकागो शहराच्या दक्षिण भागात एकाच परिसरात किंवा आळीत होते. १७ डिसेंबर १९४५ रोजी शील निवर्तले, त्यांची व पॉल हॅरिस यांची कबरही माऊंट होप स्मशानभूमीत शेजारी शेजारी आहे. हॅरी एल. रगल्स यांना नेहमी पाचवे रोटेरियन (फिफ्थ रोटेरियन) म्हणले जाते. त्यांनी रोटरी क्लब व इंटरनॅशनल संस्थेला व्यवस्थित दिशा दाखवली, शिस्त लावली, नियमावली बनवण्यात पुढाकार घेतला. अमेरिकेतील मिशिगनचे असलेले रंगल्स एलिनॉइज राज्यातील इव्हान्स्टन येथील नॉर्थवेस्टर्न विद्यापीठात शिकले. रोटरी क्लबच्या दुसऱ्या सभेत मीटिंगला त्यांनी, रोटरी सदस्यता स्वीकारली. रोटरी क्लब शिकागोच्या पहिल्या वर्षी (१९०५ - १९०६) ते क्लबचे कोषाध्यक्ष होते. १९०८ ते १९१० ते याच क्लबचे अध्यक्ष होते. १९१२ ते १९१३ ते रोटरी इंटरनॅशनलचे डायरेक्टर होते. रोटरी क्लबमध्ये प्रार्थना त्यांनी सुरू केले. त्यांच्या एच. एल. रर्गल्स आणि कंपनीचा छापखाना होता. तेथेच द नॅशनल रोटेरियन आणि रोटरी साँगबुक छापले गेले. २२ ऑक्टोबर १९५९ ला ते निर्वतले, तेव्हा ते सात क्लबचे सन्माननीय सदस्य होते आणि स्वतः च्या क्लबचे क्रियाशील सदस्य ही पॉल हॅरिस यांच्या, विविध व्यावसायिक एकत्र आणून रचनात्मक सुसंवाद घडवून आणण्याच्या स्वप्नामधून ही चार माणसं एकत्र आली काय आणि एक जागतिक दर्जाची, सेवा व सद्भाव जपणारी विश्वबंधुत्वाची संदेश देणारी, जात पात- धर्म-वर्ण- देश- खंड यांच्यापलीकडे जाऊन मानवतेला जपणारी, जोपासणारी, महत्त्व देणारी संघटना तयार झाली काय, सारेच अलौकिक !!

**रो. डॉ. सुनील देशपांडे,** रोटरी क्लब वाई

# मातेचे दूध:नवजात शिशुचे कवचकुंडल

मातेचे दूध हे सर्वगुणसंपन्न असते. परस्परांच्या आरोग्याला फायदेशीर असते. नवजात शिशूसाठी तर ते विविध आजारांपासून संरक्षण देणारे कवचकुंडल आहे. हिमोफीलस इंफ्लुएंजा, न्यूमोनिया, मेनिंनजायटीस, बोटूलीझम, आतड्यांचे विविध आजार, डायरिया, मूत्रमार्गाचे संसर्ग इत्यादी अनेक रोगांपासुन मातेचे दुध बाळाला संरक्षण देते. मातेच्या दुधाला Living Fluid म्हणतात. का? त्यातून विविध पांढऱ्या पेशी (सैनिक पेशी), प्रतिजैविके मातेपासून बाळाच्या शरीरात प्रवेश करतात. त्यामुळे बाळाला रोगप्रतिकारक क्षमता मिळते आणि वर नमूद केलेल्या अनेक संसर्गजन्य आजारांपासून त्या नाजूक जिवाचे संरक्षण होते, पर्यायाने बाल मृत्युदरसुद्धा कमी होतो.

पचायला एकदम हलके ! आवश्यक त्या तापमानाला तसेच आवश्यक तेव्हा उपलब्ध ! पाणी, क्षार, ग्लुकोज इ. चे योग्य मिश्रण. यासाठी कुठलाही अतिरिक्त खर्च नाही. स्तनपानावेळी आई आणि बाळामधील अंतर हे सर्वांत कमी असते. मूल हे आईच्या अगदी जवळ असते की ते सहज आपल्या आईच्या हृदयाचे ठोके ऐकू शकते, या प्रक्रियेतून बाळामध्ये आनंद, समाधान आणि सुरक्षिततेची भावना वाढीस लागते. स्तनपान चालू असताना मातेच्या शरीरात ऑक्सिटोसिन हे एक प्रेम वाढवणारे संप्रेरक (Love Hormone) असून यामुळे स्तनपान करणाऱ्या माता आणि त्यांचे मूल यांच्यामध्ये एक उच्चपातळीचे भावनिक संबंध निर्माण होण्यास मदत होते.

आईचे दूध म्हणजे प्रेमामृत आहे. प्रसूतीपश्चात लवकर स्तनपान सुरू केल्याने मातेला रक्तस्त्राव कमी होतो. गर्भाशय आणि इतर अवयव पूर्वपदावर येण्यास मदत होते. या सर्व गोष्टींमुळे माता मृत्युदरसुद्धा कमी होतो. स्तनपान म्हणजेच आईचे स्वतः साठी भविष्यात कर्करोगापासून बचावाचे प्रतिबंधक तंत्र आहे. स्तनपानामुळे मातेला Breast cancer and Ovarian cancer या दुर्धर आजारांपासून संरक्षण मिळते. स्तनपानामुळे मासिकपाळी ६-७ महिने लांबते. त्यामुळे तिला नैसर्गिकरित्या गर्भधारणेपासून संरक्षण मिळते. स्तनपान म्हणजे मातेची स्वतःला, तिच्या बाळाला आणि या पृथ्वीला दिलेली एक भेट आहे.





**जागतिक आरोग्य संघटनेच्या सल्ल्यानुसार**

१. स्तनपानाची सुरुवात बाळाच्या जन्मानंतर पहिल्या एक तासांमध्ये झाली पाहिजे.

२. पहिल्या सहा महिन्यांपर्यंत शिशुला मातेच्या दुधाव्यतिरिक्त मध, गाईचे दूध व इतर कुठलेही पदार्थ देऊ नयेत. अगदी पाणीसुद्धा ! उन्हाळा आहे बाई, बाळाला तहान लागली असेल, त्याचा घसा कोरडा पडला असेल, थोड पाणी पाजते त्याला ...... अं हूं नाही म्हणजे नाहीच! मातेच्या दुधात आवश्यक तेवढे पाणी उपलब्ध असते.

३. प्रसूतीपश्चात २४ महिन्यापर्यंत किंवा त्याच्या पलीकडेही स्तनपान है सुरक्षित आहे. सहा महिन्यांच्या पुढे स्तनपानासोबत इतरही सुरक्षित पूरक अन्न बाळाला भरविण्यास सुरुवात करावी.

**जागतिक स्तनपान सप्ताह दरवर्षी १ ते ७ ऑगस्ट दरम्यान साजरा केला जातो.** माझ्या दृष्टीने पालकांचे सक्षमीकरण हा स्तनपानासाठी अत्यंत उपयुक्त घटक आहे.

* पालकांचे सक्षमीकरण या संकल्पनेमध्ये कामकाजी पालकांच्या उत्पादन आणि प्रजोत्पादन या दोन्ही क्षमतांचे एकत्रीकरण असलेली कार्यव्यवस्था अपेक्षित आहे.

* मातेला मिळालेल्या दीर्घकालीन भरपगारी प्रसूति रजेच्या सुविधेमुळे नवजात शिशु चे भरणपोषण व बाढ चांगल्या पद्धतीने होते. प्रत्येक महिन्यामागे बाल मृत्युदर १३% नी कमी होतो.

* स्तनदा मातेला योग्य अशा पद्धतीच्या कामाची निवड करण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. पुरुषांनी माता आणि बाल संगोपनाच्या कार्यामध्ये स्वतःचा वाटा उचलला तर स्त्रियांचे कार्य अधिक जास्त प्रभावी होऊ शकते.

* जेव्हा स्त्रियांना कार्यस्थळावर सुद्धा स्तनपानाची आणि बालसंगोपनाची सुविधा उपलब्ध असते तेव्हा त्या आपल्या कामामध्ये दीर्घकालीन आणि उत्कृष्ट योगदान देऊ शकतात असे निरीक्षणाअंती आढळून आले आहे.

**रोटरी क्लब काय करू शकतो ?**

* रोटरी इंटरनॅशनलच्या फोकस एरीयामध्ये माता आणि शिशु आरोग्य Maternal and Child Health महत्वाचा भाग आहे.

* भारतीय समाजात स्तनपान ही सर्वमान्य प्रक्रिया आहे. पण ते अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने होण्यासाठी, पुरुषांचा शिशुसंगोपणात सहभाग वाढविण्यासाठी, प्रबोधन करण्याची जबाबदारी रोटरीने आपल्या खांद्यावर घ्यावी.

* गर्भवती आणि स्तनदा मातांना स्तनपानाचे महत्त्व समजवून सांगण्यासाठी अनेक बैठकीचे नियोजन करूयात. * स्तनपान साहाय्यता गटांची स्थापना करूयात.

* विविध खाजगी, सरकारी, निमसरकारी कार्यालयांतील तसेच असंघटित क्षेत्रातील स्त्री कामगारांसाठी कार्यस्थळी **हिरकणी कक्षाची** स्थापना करूयात किंवा तशी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व्यवस्थापनाशी चर्चा करूयात. व्यवस्थापनाला त्याचे महत्त्व समजून सांगूयात.

* स्तनपानाचे महत्व तसेच शिशु संगोपनातील पुरुषांच्या जबाबदाऱ्यांची जाणीव पुरुषांमध्ये वाढविण्यासाठी विविध कार्यशाळांचे आयोजन करूयात. या कार्यामध्ये आपल्याला एकात्मिक बाल विकास प्रकल्पाचे अधिकारी, अंगणवाडी ताई किंवा आशाताई इत्यादींचे सहकार्य निश्चित लागू शकते. एका दिवसासाठी काही गोष्टी वाटण्यापेक्षा आयुष्यभर पुरेल असे ज्ञान वाटणे कधीही श्रेष्ठ असते. मातेसाठी स्तनपान ही एक आवडी निवडीची गोष्ट नसून ती एक जबाबदारी आहे. ही जबाबदारी योग्यरीत्या पार पाडण्यासाठी आवश्यक प्रबोधन करण्याची चळवळ रोटरीने उभी केली पाहिजे.

**- रो. डॉ. विनोद लड्डा,**
डिस्ट्रिक्ट को-ऑर्डिनेटर-
पब्लिक इमेज. ९९६०५८६८६४.

# पर्यावरण संवर्धन करावेच





जून २०२० मध्ये आरआय संचालक आणि रोटरी फाउंडेशन बोर्डाने रोटरीचे सातवे फोकस क्षेत्र म्हणून पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन हा विषय रोटरीच्या कामकाजाचा भाग बनला. तसे पाहीले तर अनेक रोटरी क्लब पर्यावरणाबाबतचे अनेक प्रकल्प गेल्या अनेक वर्षापासून घेत आहेत, पण जागतिक स्तरावर होणाऱ्या हवामान बदलाचा परिणाम आणि पृथ्वीवरील जैविक संसाधनाचे संरक्षण ही बाब महत्वाची बनली म्हणून रोटरीनी पर्यावरण हे आपले फोकस क्षेत्र मानुन त्यावर कार्य करण्यास सुरुवात केलेली आहे.

रोटरीने लोकसहभागातुन कार्य करून पर्यावरण सुधारण्यासाठी अनेक सेवा प्रकल्प घेतलेले आहेत. या प्रकल्पाद्वारे लोकांच्या आरोग्याला आधार देवून त्याद्वारे स्वास्थ सुधारण्यास मदत होत आहे. पर्यावरण संरक्षणासाठी अनेक उपाययोजना करून वेगळे प्रकल्प आपणास घेता येईल. याबाबत रोटरी क्लबनी विचार करणे आवश्यक आहे. जसे की, घनकचरा व्यवस्थापन, जल व्यवस्थापन, ऊर्जा संवर्धन, वृक्षारोपण या प्रकल्पामुळे पर्यावरणचा ऱ्हास थांबवता येते व शाश्वत विकासाला चालना मिळते.

कचरा व्यवस्थापना अंतर्गत कचरा कमी करणे, वस्तुंचा पुनर्वापर करणे, प्लॉस्टीकचा वापर टाळणे, घरामधील कचरा वेगळा करून ओला कचरा खत बनवण्यासाठी वापरणे व सुका कचरा पुनर्वापर करण्यासाठी घेणे या सर्व प्रकल्पावर आपण काम करू शकतो.

जल व्यवस्थापना अंतर्गत पाणी वाचवणे, नळाला आलेली गळती दुरुस्त करणे, पाणी जपून वापरणे, पावसाचे पाणी साठवणे, छतावरील पावसाचे पाणी साठवून त्याचा पुर्नवापर करणे या सर्व प्रकल्पावर आपण काम करू शकतो.

ऊर्जा संवर्धन अंतर्गत पारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर याबाबत जन-जागृती करणे, सौर ऊर्जाचा वापर याबद्दल लोकांना महत्व पटवून देणे, कमी ऊर्जा वापणाऱ्या उपकरणांचा वापर करणे याबाबत ग्रामस्थांमध्ये व शालेय विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्याचे प्रकल्प आपण घेऊ शकतो. त्याप्रमाणे, प्रदुषण नियंत्रण करण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणे, सायकल चालवणे, कमी प्रदुषण करणाऱ्या गाड्यांचा वापर करणे, आवाजाची पातळी कमी ठेवणे, अनावश्यक आवाज टाळणे, याबाबत चित्र प्रदर्शन, मॅरेथॉन व विद्यार्थ्यांमध्ये रायला प्रकल्पाद्वारे त्याचे महत्व सांगु शकतो.

रोटरी क्लबच्या पर्यावरण संवर्धनाच्या अशा प्रकल्पामुळे रोटरीची पब्लिक इमेज जनमाणसात उंचावण्यास मदत होते. पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होतो आणि जनसमुदायाच्या शाश्वत उज्वल भविष्यासाठी मदत होते.

**- रो. ॲड. सतिश दिवाण**
संचालक पर्यावरण,
रोटरी क्लब, लातूर

# रोटरीतर्फे वृक्षारोपण



लातूर : रोटरी क्लब लातूरच्या वतीने मंगळवार, १ जुलै रोजी सकाळी ६.३० वाजता एमआयडीसी परिसरात ५० वृक्षांचे रोपण ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या सहकार्याने करण्यात आले. उद्घाटन प्रमुख पाहुणे डीजी रो. सुधीर लातुरे यांच्या हस्ते झाले. यावेळी रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष ज़कीखान कायमखानी, सचिव विश्वनाथ निगुडगे, रविशंकर हिंगणे, मोहन परदेसी, महेंद्र जोशी, बाबुराव सोमवंशी, विनोद लड्डा, नागनाथ कलवले, ॲड. सतीश दिवाण, ॲड. श्रीराम देशपांडे, आसीफ शेख, डॉ. प्रसाद राठी, प्रा.डॉ. गोपाल बाहेती, सुधाकर कोटगीरे, डॉ. हरीप्रसाद सोमाणी, सुनिल कोचेट्टा, ॲड.जांबुवंतराव सोनकवडे, सुशांत कुलकर्णी, प्रविण होळीकर, ॲड. विश्वजीत कदम, ब्रह्मकुमार सुवर्णकार, हर्षद राजूरकर, नरेश कोरे, श्रीमंत कावळे, आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनचे प्रवृत्तक डॉ. पवन लड्डा यांची प्रमुख उपस्थिती होती. फक्त वृक्ष लागवड करून थांबणार नाहीत तर ते जगविण्यासाठीही प्रयत्नशील राहणार असल्याचे जकीखान कायमखानी म्हणाले.

## अभिनंदन

## रोटरी क्लब लातूरचे माजी सचिव रोटेरियन ज़कीखान कायमखानी यांना उत्कृष्ट सचिव पुरस्कार

**लातूर :** रोटरी वर्ष २०२४-२५ साठी रोटरी क्लब लातूरचे माजी सचिव रोटेरियन जकीखान कायमखानी यांना उत्कृष्ट सचिव या सन्मानाने गौरविण्यात आले. हा पुरस्कार डिस्ट्रिक्ट अवॉर्ड सेरेमनी दरम्यान, जालना येथे, ३ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या विजयोत्सव कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. रोटरी क्लब लातूरला बेस्ट प्रोजेक्ट्स इन डिस्ट्रिक्ट एम्फेसिस हाई पुरस्कार देवून गौरवान्वीत करण्यात आले. क्लबच्या वतीने हा पुरस्कार माजी अध्यक्ष रो. श्री श्रीमंत कावळे यांनी स्वीकारला तसेच उत्कृष्ट सहप्रांतपाल म्हणून क्लबचे गेल्या वर्षीचे सहप्रांतपाल हेमंत रामढवे यांना सन्मानित करण्यात आले. क्लबचे सदस्य रो नानिक जोधवानी यांनाही बेस्ट असिस्टंट गवर्नर पुरस्कार प्रदान करण्यात आला. तर रो डॉ. विनोद लड्डा यांनाही इंटरनॅशनल सर्विस या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल सन्मानित करण्यात आले .

या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि त्यांच्या भावी रोटरी वाटचालीसाठी शुभेच्छा हा सन्मान प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सन्मान स्वीकारताना रोटेरियन जकीखान कायमखानी यांनी या यशाचे श्रेय रोटरी क्लब लातूरच्या सर्व सदस्यांना दिले. तसेच, पुढेही कार्यरत राहीन असे आश्वासन त्यांनी यावेळी व्यक्त केले.

## ऑगस्टमधील रोटरी क्लब लातूरच्या कामांचा संकल्प



हॅप्पी स्कूल अंतर्गत जिल्हा परिषद शाळेला रंग देण्यासाठी कलर सेट भेट.



मराठवाडा विद्यालय लातूर येथे ग्रंथालयासाठी पुस्तकांची भेट.



लालबहादूर शास्त्री विद्यालयात कॉम्प्युटर संच भेट.



लातूर शहरातील जिल्हा क्रीडासंकुल येथे येणाऱ्या नागरिकांसाठी 'Know you Number' या अंतर्गत आरोग्य तपासणी.

# रोटरी क्लब लातूर तर्फे आवाहन

## गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी सायकल दान करा

आजही आपल्या आजूबाजूच्या अनेक गाव, खेड्यांतील हजारो चिमुकल्या पायांना शिक्षणाच्या दिशेने चालावं लागतं.



४-५ किमीचा रोजचा प्रवास, उन्हं, पावसात ओलचिंब होणं, धूळ-धक्का आणि थकवा, ही केवळ गोष्ट नाही, तर त्यांच्या संघर्षाची रोजची कहाणी आहे. या कहाणीत थोडं समाधानाचं पान आपण लिहू शकतो का? होय! - म्हणूनच रोटरी क्लब, लातूरच्या वतीने आम्ही एक हृदयस्पर्शी उपक्रम सुरू करत आहोत.

**सायकल दान, शिक्षणास मदत!**

आपल्या घरात पडून राहिलेल्या, वापरात नसलेल्या जुन्या सायकली ज्या कदाचित धूळ खातायत, त्यांना नवजीवन देऊया. त्या दुरुस्त करून, गरजू विद्यार्थ्यांच्या हातात सुपूर्द करूया. त्या चाकांमुळे कोणाचं आयुष्य फिरू लागेल. एका स्वप्नाला गती मिळेल. हा उपक्रम म्हणजे केवळ सायकल देणं नव्हे - तो एक विश्वास देणं आहे!

* शाळेपर्यंतचा मार्ग सोपा होतो * वेळ वाचतो आणि आत्मविश्वास वाढतो * शिक्षणात सातत्य राखलं जातं * थांबलेली पावलं पुन्हा चालू लागतात. या उपक्रमासाठी आम्हाला तुमची गरज आहे! * जर तुमच्याकडे जुनी सायकल असेल. ती एखाद्या विद्यार्थ्याचं भविष्य बनू शकते.

* तुम्ही सायकल गॅरेजवाले, दुरुस्ती करणारे असाल - तर तुमचं कौशल्य या सामाजिक बदलासाठी अमूल्य आहे

* आपण सामाजिक भान ठेवणारे नागरिक असाल - तर हीच वेळ आहे पुढे येण्याची एक जुनी सायकल - एखाद्याच्या स्वप्नांना नवे पंख देऊ शकते! आज आपण सायकल दान करतोय.

उद्या, ते मुल शिक्षक होऊन एखाद्या गावाला उजळवेल, एखादी मुलगी डॉक्टर होऊन आपल्या समाजाचं आरोग्य सांभाळेल. या उपक्रमात सहभागी व्हा, जुनी सायकल दान करा - आणि कोणाच्या आयुष्यात एक नवी दिशा जोडा! आपली साथ हवी आहे!

**- ॲड. विश्वजित कदम.**
प्रकल्प प्रमुख - सायकल दान उपक्रम,
रोटरी क्लब, लातूर. ९४२२४६९१२४

## रोटरी क्लब लातूर सन्माननीय अध्यक्ष ज़की भाई व सचिव विश्वनाथजी आणि आपल्या क्लबच्या सर्व सन्माननीय सदस्यांना सप्रेम नमस्कार...

आपण प्रकाशित करत असलेल्या प्रथम बुलेटिन चक्रधरसाठी आपणास खूप खूप शुभेच्छा. आपल्या वर्षाची सुरुवात एक जुलै २०२५ पासून झालेली आहे. गेल्या एक महिन्याच्या काळात व त्यापूर्वी अध्यक्ष जकीभाई कायमखानी व त्यांच्या टीमने क्लबच्या कामासाठी ज्या प्रकारे वाहून घेतले आहे ते पाहता मला पूर्ण खात्री आहे येणाऱ्या वर्षात प्रत्येक ॲव्हेन्यूच्या उपक्रमामध्ये आपल्या क्लबचे काम उत्तम असे असणार आहे.



त्याकरिता आपल्याला आपल्या क्लब मधील वरिष्ठ अनुभवी व तज्ञ सदस्यांची साथ लाभणार आहे. त्यामुळे निश्चितच आपले वर्ष यशोमान कीर्तीचे व झळाळीचे राहील याबद्दल कसली शंका नाही. हा ऑगस्ट चा महिना मेंबरशिप डेव्हलपमेंट चा महिना आहे त्याकरिता आपण आपल्या क्लबच्या संख्येमध्ये ५० ते ६० प्रतिशत वाढ केल्याचे दिसत आहे. याबद्दल सर्वप्रथम आपले अभिनंदन. आपली प्रत्येक क्षेत्रामध्ये अशीच वाटचाल सुरू राहावी याकरिता हार्दिक शुभेच्छा देतो. मेंबरशिप डेव्हलपमेंट करता नवीन मेंबर्स समाविष्ट करणे जुन्या मेंबरचे रिटेन्शन व रीकनेक्शन यासाठीचे प्रयत्न मोलाचे ठरतात. आपल्या बुलेटिनमध्ये आपल्या रोटरीचे वृत्तांकन, क्लबच्या उपक्रमांची माहिती, सामाजिक व आध्यात्मिक ज्ञान तसेच मनोरंजन इत्यादी विविध पैलूंचा समावेश असेल याकरिता प्रयत्न करावेत. परत एकदा आपल्याला या २०२५-२६ रोटरी वर्षाकरिता हार्दिक हार्दिक शुभेच्छा, धन्यवाद.

**रो. रविशंकर हिंगने, सहप्रांतपाल**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** कायमखानी पेट्रोल पंप, अंबाजोगाई रोड, लातूर. मो. ९८२३११६०७०

**संपादक :** रो. नागनाथ कलवले. ९७६४७ ८८२८८

**सहसंपादक :** रो. आसीफ शेख ९९७५१ २४४२७

**डिझाईन, लेआऊट** एम.एस. मीडिया, लातूर ८८३०२७३०३८


७९ व्या
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
फैसलखान कायमखानी
हॉटेल ॲम्बेसी इंटरनॅशनल, लातूर

ROTARY

R O T A R Y I N T E R N A T I O N A L

Rotary

UNITE FOR GOOD

# The Four-Way Test

## Of the things we think, say or do

माझे विचार, शब्द किंवा कार्य...

***First***

Is it the TRUTH?

हे सत्य आहे काय?

***Second***

Is it FAIR to all concerned?

हे पारदर्शक आहेत काय?

***Third***

Will it build GOODWILL and BETTER FRIENDSHIPS?

त्यामुळे सुसंबंध व मित्रत्व प्रस्थापित होईल काय?

***Fourth***

Will it be BENEFICIAL to all concerned?

ते सर्व समाजाला फायदेशीर ठरतील काय?

Rotary Club Latur - 2025-26

R O T A R Y I N T E R N A T I O N A L

INTERNATIONAL